Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

UGC Approved Monthly Journal

VOL-IV ISSUE-VIII Aug. 2017

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# भारतात प्रौढ शिक्षणाची आवश्यकता

**संतोष ह. कोकाटे**
संशोधक विद्यार्थी, शिक्षणशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

**सारांश :**

*मानवी जीवनामध्ये शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. शिक्षणामधूनच मानवी जीवनाचा विकास होतो. व्यक्ती विविध व्यवसायामध्ये शिक्षणाच्या माध्यमातून पुढे-पुढे जात असतो. शिक्षण हे माणसाला स्वावलंबी बनविते. सुसंस्कृत माणूस समाज घडविण्याचे काम करतो. म्हणून शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. परंतु काही लोकांना पालकांच्या अज्ञानामुळे, गरिबीमुळे किंवा इतर काही बाबींमुळे लहानपणी शाळेत जाता आले नाही. काहींना अर्धवट शाळा सोडावी लागली. अशा लोकांसाठी शासनाने स्वातंत्र्योत्तर प्रौढ शिक्षण मोहीम सुरू केली. कोठारी आयोगाने १९६४-६५ मध्ये प्रौढ साक्षरता शब्द सर्वप्रथम वापरला. राष्ट्रीय शिक्षण आयोग (१९६८), राष्ट्रीय शिक्षण आयोग (१९८६) मध्ये साक्षरता तथा प्रौढ शिक्षण शब्द वापरलेत.प्रौढ शिक्षणातून खालील बाबी अपेक्षित होत्या.*

*१) साक्षरता*
*२) समाजस्वास्थ्य शिक्षण*
*३) व्यावसायिक शिक्षण*
*४) नागरिक शिक्षण*
*५) सांस्कृतिक शिक्षण*

**प्रस्तावना :**

मानवी जीवनात साक्षरतेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. साक्षरता ही व्यक्तीच्या, समाजाच्या आणि राष्ट्राच्या विकासासाठी आवश्यक आहे. साक्षरता कार्य हे National Literacy Mission तर्फे सुरू आहे. साक्षरता अभियान चळवळ सुरू असून या चळवळीला शासन स्तरावर राजकीय स्तरावर पाठींबा मिळूनही खऱ्या अर्थाने निरक्षरता सर्व संपलेले नाही. कारण खऱ्या अर्थाने समाजबळ मिळणे देखील आवश्यक आहे.

**प्रौढ शिक्षण संकल्पना**

प्रौढ शिक्षणाचा एकूण शिक्षण प्रणालीशी जवळचा संबंध आहे. कारण शिक्षण प्रक्रियेचा आपण विचार केला तर आपणास तीन संकल्पनांचा विचार करणे अगत्याचे ठरते.

**१) औपचारिक शिक्षण (Formal Education):**

शाळा, महाविद्यालयात दिले जाणारे शिक्षण यामध्ये येते.

**२) अनौपचारिक शिक्षण (Non Formal Education) :**

अनौपचारिक शिक्षण पध्दतीत मात्र यामध्ये सर्व बाबी लवचीक असतात. यामध्ये वय, अभ्यासक्रम, कालावधी याबाबत लवचिकता असते. पंचविस वर्षांचा व्यक्ती सुध्दा पहिलीत शिक्षण घेऊ शकतो.

**३) सहज शिक्षण (Informal Education) :**

माणूस दैनंदिन जीवन जगत असताना जो ज्ञान अवगत करतो ते सहज शिक्षण असते. व्यक्ती स्वतः अनुभवातून हे शिक्षण घेत असतो. यामध्ये निरीक्षण, कौटुंबिक व सामाजिक चालीरीती, रूढी, परंपरा इत्यादी गोष्टीचा समावेश होत असतो.

प्रौढ शिक्षणाची संकल्पनाही व्यापक संकल्पना आहे. कारण यामध्ये केवळ निरक्षर लोकांचा समावेश होत नाही तर अर्धवट शाळा सोडलेल्या लोकांचा ही यामध्ये समावेश होतो.

ढोबळ मानाने म्हणता येईल की, "प्रौढ वयात दिले जाणारे शिक्षण म्हणजे प्रौढ शिक्षण होय."

**प्रौढ शिक्षणाचा अर्थ :**

व्यक्तीला व्यवहारिक ज्ञान, लिहिता-वाचता, तंत्रज्ञान, इत्यादी कौशल्य येण्यासाठी दिले जाणारे शिक्षण म्हणजे प्रौढ शिक्षण आहे.

१९६६ मध्ये डॉ. दौलतसिंग कोठारी (शिक्षण) आयोगाने आपल्या विवेचनामध्ये शिक्षणाच्या संदर्भात म्हटले आहे की, "There are also those who are working on farms, workshop, factories, commercial house as well as those who are self employed who need training for improving their efficiency. Even those engaged at high professional levels need to refresh their knowledge and become acquainted with the new thinking and practices in their fields of specialization, more particularly teachers at all stage of education, including the university, must have opportunities of keeping themselves a fresh of the advancing frontiers of knowledge. This also applies Lawyers, Doctors, Business Managers, Industrial Chiefs and others at the top of their professions. There are also who wish to learn something for joy of it, for example a foreign language or painting or music or interior decoration or cooking or flower arrangement or something else concerned with the occupation in life.

प्रौढ शिक्षणाद्वारे लोकांना साक्षर केल्याचा प्रयत्न केला जातो. ज्या लोकांनी शाळा अर्थवट सोडली आहे किंवा शाळेतच गेलेले नाहीत. अशा १५ ते ३५ वयोगटातील लोकांना प्रौढ शिक्षणाद्वारे साक्षर केले जाते.

साक्षर भारत अभियान २०१२ अन्वये निरक्षर, प्रौढ १५ वयापेक्षा पुढील प्रौढ नागरिकांचा यात समावेश केलेला आहे.

**प्रौढ शिक्षणाचे उद्दिष्ट्ये :**

१) शाळेत न गेलेल्या प्रौढांना कार्यात्मक साक्षरता वर्गाच्या माध्यमातून शिक्षण देणे.
२) अर्धवट शाळा सोडलेल्या प्रौढांना कार्यात्मक साक्षरता वर्गाच्या माध्यमातून शिक्षण देणे.
३) निरंतर शिक्षण केंद्राच्या माध्यमातून शिक्षण सुरू ठेवणे.
४) प्रौढ नागरिकांकरिता, सांस्कृतिक, पर्यावरणीय तथा जीवन कौशल्यावर आधारित शिक्षण देणे.
५) प्रौढ लोकसंख्या शिक्षण देणे.
६) व्यावसायिक, कार्यात्मक शिक्षण देणे.
७) प्रौढांना जीवन जगण्यासाठी सक्षम बनविण्यासाठी आवश्यक गुण, कौशल्य विकसित शिक्षण देणे.
८) सामाजिक परिवर्तनासाठी प्रौढांना तयार करणे.
९) नवीन कौशल्य, नवीन ज्ञान घेण्याकरिता त्यांच्यातील सुप्तगुण विकसित करणे.
१०) प्रौढांना आपल्या अवती-भवतीच्या घटनांचा योग्य अर्थ लावण्याइतपत समज निर्माण होईल असे शिक्षण देणे.
११) सामाजिक चालीरीती, सांस्कृतिक विभिन्नता या विषयी आदर निर्माण करण्याच्या उद्देशाने शिक्षण देणे.

**प्रौढ शिक्षणाचे महत्त्व तथा आवश्यकता :**

समाज शिक्षणाचे महत्त्व आणि आवश्यकता या विषयी स्वामी विवेकानंद यांनी म्हटले होते की, "जब तक लाखो लोग भूखे तथा अज्ञानी है, मैं हर उस व्यक्ती को जो उनके खर्चे पर पढता है, किंतु उनकी ओर ध्यान नही देता, गद्दा मानता हू। हमारा सबसे बडा पाप यह है की हम जनता की शिक्षा की उपेक्षा करते है और यही हमारे अवनती का कारण है। जब तक भारत की जनता अच्छी प्रकार शिक्षित नही हो जाती, अच्छी प्रकार पेट नही भरती और जब तक उनकी अच्छी प्रकार देखभाल नही होती तब तक राजनीतिक प्रयत्न व्यर्थ है।"

१) मानसिक दास्यामधून मुक्ती मिळविण्यासाठी
२) प्रौढ शिक्षण आणि आर्थिक विकास यांचा जवळचा संबंध आहे.
३) प्रौढ शिक्षणामधून स्वातंत्र्याविषयी जागरूकता निर्माण होते.
४) प्रौढ शिक्षणामधून जीवनमानाचा दर्जा उंचावतो.

**प्रौढ शिक्षणाचा दर आणि प्रतिव्यक्ती C.N.P. यांचा सहसंबंध (काही देश) (१९९५) :**

| अ. क्र. | देश | प्रतिव्यक्ती आयम अमेरिकी डॉलर | प्रौढ शिक्षण दर |
|---|---|---|---|
| १ | अफगाणिस्तान | २५० | ३२ |
| २ | ऑस्ट्रेलिया | २६८९० | ७७ |
| ३ | बांग्लादेश | २४० | ३८ |
| ४ | भुतान | ४२० | ४२ |
| ५ | कॅनडा | १९३८० | ९७ |
| ६ | चीन | ६२० | ८२ |
| ७ | डेनमार्क | २९८९० | ९९ |
| ८ | फिनलँड | २०५८० | ९९ |
| ९ | फ्रान्स | २४९९० | ९९ |
| १० | जर्मनी | २७५१० | ९९ |
| ११ | भारत | ३४० | ५२ |
| १२ | इटली | १९०२० | ९८ |
| १३ | जपान | ३९६४० | ९९ |
| १४ | नेपाल | २०० | २८ |
| १५ | नार्वे | ३१२५० | ९९ |
| १६ | रूस | २२४० | ९९ |
| १७ | श्रीलंका | ७०० | ९० |
| १८ | स्वीडन | २३७२० | ९९ |
| १९ | स्वित्झर्लंड | ४०६३० | ९९ |
| २० | युनायटेड किंगडम | १८७०० | ९९ |
| २१ | युनायटेड स्टेटस | २६९८० | ९९ |

उपरोक्त आकडेवारीवरून विकसित देशांमधील साक्षरता दर खूप उच्च पातळीवर आहे असे दिसून येते.

- प्राथमिक शिक्षणाच्या सक्तीसाठी प्रौढ शिक्षण आवश्यक आहे.
- राष्ट्रीय विकासामध्ये प्रौढ शिक्षणाचे मोठे योगदान आहे.
- नागरिकांच्या संपूर्ण क्षमतांचा विकास करण्याकरिता प्रौढ शिक्षण आवश्यक आहे.
- व्यक्तिगत आर्थिक विकास साधण्याकरिता प्रौढ शिक्षण आवश्यक आहे.
- समाजामध्ये राहण्याची कला विकसित करण्याकरिता प्रौढ शिक्षण आवश्यक आहे.
- अंधश्रध्दा नष्ट करण्याकरिता प्रौढ शिक्षण आवश्यक आहे.
- आत्मनिर्भर बनण्यासाठी प्रौढ शिक्षण आवश्यक आहे.
- सहकारी संस्थांच्या विकासाकरिता प्रौढ शिक्षणाची आवश्यकता आहे.
- व्यावसायिक आणि जीवनउपयोगी ज्ञान अवगत करण्याकरिता प्रौढ शिक्षण आवश्यक.
- सामाजिक आणि राष्ट्रीय एकात्मकता विकासाकरिता प्रौढ शिक्षण आवश्यक
- सांस्कृतिक विकासाकरिता प्रौढ शिक्षण आवश्यक

- वाढत्या लोकसंख्येला आळा घालणे अथवा वाढत्या जन्मदरावर नियंत्रण मिळण्याकरिता प्रौढ शिक्षण आवश्यक
- निरागी जीवनासाठी प्रौढ शिक्षण आवश्यक
- मनोरंजनाकरिता प्रौढ शिक्षण आवश्यक
- पर्यावरणाच्या सुरक्षिततेकरिता प्रौढ शिक्षण आवश्यक
- देशाच्या निर्णायक / महत्त्वाच्या पदावर महिलांचा सहभाग वाढण्याकरिता प्रौढ शिक्षण आवश्यक.

**भारतातील प्रौढ शिक्षणाचा इतिहास :**

कामातील प्रौढ योजना /चळवळ राबवूनही साक्षरतेचा विकास खूपच मंद गतीने झाला आहे. ते पुढील तक्त्यावरून दिसून येईल.

| अ.क्र. | वर्षे | टक्केवारी | पुरुष | स्त्रिया | वाढ | पुरुष | स्त्रिया |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९०१ | ५.३५ | ९.८३ | ०.६० | - | - | - |
| २ | १९११ | ५.९२ | १०.५६ | १.०५ | ०.५७ | ०.७३ | ०.४५ |
| ३ | १९२१ | ७.१६ | १२.२१ | १.८१ | १.२४ | १.६५ | ०.७६ |
| ४ | १९३१ | ९.५ | १५.५९ | २.९३ | २.३४ | ३.३८ | १.१२ |
| ५ | १९४१ | १६.१ | २४.९ | ७.३० | ६.६ | ९.३१ | ४.३७ |
| ६ | १९५१ | १६.६७ | २४.९५ | ७.९३ | ०.५७ | ०.०५ | ०.६३ |
| ७ | १९६१ | २४.०२ | ३४.४४ | १२.९५ | ७.३५ | ९.४९ | ५.०२ |
| ८ | १९७१ | २९.४५ | ३९.४५ | १८.६९ | ५.४३ | ५.०१ | ५.७४ |
| ९ | १९८१ | ३६.२३ | ४६.८९ | २४.८२ | ६.७८ | ७.४४ | ६.१३ |
| १० | १९९१ | ४२.८४ | ५२.७४ | ३२.१७ | ६.६१ | ५.८५ | ७.३५ |
| ११ | २००१ | ५४.५१ | ६३.२४ | ४५.१५ | ११.६७ | १०.५ | १२.९८ |
| १२ | २०११ | ६४.३२ | ७१.२२ | ५६.९९ | ९.८१ | ७.९८ | ११.८४ |

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर साक्षरता प्रसाराकडे प्रमुख लक्ष केंद्रित करण्यात आले. निरक्षरता वाढण्याचे प्रमुख कारण म्हणजे लोकसंख्येत झालेली प्रचंड वाढ, प्रत्येक बालक शिकण्यासाठी जाऊ शकत नव्हता. शाळेत गेलेला बालक दारिद्र्यामुळे शाळा सोडत असे. या कारणांमुळे साक्षरतेचे प्रमाण फारच कमी असलेले दिसून येते.

प्रत्येक राज्या-राज्यामध्ये सुध्दा साक्षरतेच्या बाबतीत वेगवेगळी परिस्थिती दिसून येते. याचे कारण म्हणजे राज्यात असणारी अनुकूल परिस्थिती केरळ राज्यात १०० टक्के साक्षरता दिसून येते. याच कारण म्हणजे नियोजनबध्द कार्यप्रणाली, नागरिकांना शिकण्यासाठी प्रवृत्त करणे, नागरिकांमध्ये जाणीव जागृती करण्यात आली.

पुढील तक्त्यावरून राज्यांमधील साक्षरता दर दिसून येतो.

**साक्षरता दर २०११**

| अ. क्र. | राज्य | साक्षरता दर | अ. क्र. | राज्य | साक्षरता दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | केरळ | ९३.९१ | १९ | दादर - नगरहवेली | ७७.६५ |
| २ | लक्षद्वीप | ९२.२८ | २० | पश्चिम बंगाल | ७७.०८ |
| ३ | मिझोरॅम | ९१.५८ | २१ | पंजाब | ७६.६८ |
| ४ | त्रिपुरा | ८७.७५ | २२ | हरियाणा | ७६.६४ |
| ५ | गोवा | ८७.४० | २३ | कर्नाटक | ७५.६० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | दमण व दीव | ८७.०७ | २४ | मेघालय | ७५.४८ |
| ७ | पाँडेचरी | ८६.५५ | २५ | ओरिसा | ७३.४५ |
| ८ | चंडीगढ | ८६.४३ | २६ | आसाम | ७३.१८ |
| ९ | न्यू दिल्ली | ८६.३४ | २७ | छत्तीसगढ | ७१.०४ |
| १० | अंदमान-निकोबार | ८६.२७ | २८ | मध्य प्रदेश | ७०.६३ |
| ११ | हिमाचल प्रदेश | ८३.७८ | २९ | उत्तर प्रदेश | ६९.७२ |
| १२ | महाराष्ट्र | ८२.९१ | ३० | जम्मू आणि काश्मीर | ६८.७४ |
| १३ | सिक्कीम | ८२.२० | ३१ | आंध्र प्रदेश | ६७.६६ |
| १४ | तामिळनाडू | ८०.३३ | ३२ | झारखंड | ६७.६३ |
| १५ | नागालँड | ८०.११ | ३३ | राजस्थान | ६७.०६ |
| १६ | मणीपूर | ७९.८५ | ३४ | अरूणाचल प्रदेश | ६६.९५ |
| १७ | उत्तराखंड | ७९.६३ | ३५ | बिहार | ६३.८२ |
| १८ | गुजरात | ७९.३१ | | | |

**महाराष्ट्रातील साक्षरता :**

२०११ च्या जनगणनेनुसार ८२.३० टक्के साक्षरता दिसून येते. त्यातही पुरुष साक्षरता ८८.४० टक्के तर महिला साक्षरता ७५.९० टक्के दिसून येते. यावरून साक्षरतेत महाराष्ट्राला अजूनही सुधारण्याकरिता वाव दिसून येतो.

| वर्ष | साक्षरता दर | पुरुष | महिला |
|---|---|---|---|
| **१९५१** | २७.९१ | ४०.४९ | १४.५६ |
| **१९६१** | ३५.०८ | ४९.२६ | १९.८० |
| **१९७१** | ४५.७७ | ५९.४० | ३१.०० |
| **१९८१** | ५७.२४ | ७०.०६ | ४३.५० |
| **१९९१** | ६४.८७ | ७६.५६ | ५२.३२ |
| **२००१** | ७६.८८ | ८५.९७ | ६७.०३ |
| **२०११** | ८२.३० | ८८.४० | ७५.९० |

वरील साक्षरता प्रगतीवरून महाराष्ट्राने साक्षरतेत वाढ झालेली असली तरी साक्षरता वाढविणे आवश्यक आहे.महाराष्ट्रात जास्त साक्षरता व कमी साक्षरता दर्शविणारे जिल्हे पुढीलप्रमाणे.

**जास्त साक्षरता असणारे जिल्हे :**

| अ.क्र. | जिल्हे | साक्षरता दर |
|---|---|---|
| १ | मुंबई (उपनगर) | ८९.९ |
| २ | मुंबई (शहर) | ८९.२ |
| ३ | नागपूर | ८८.४ |
| ४ | अकोला | ८८.०० |
| ५ | अमरावती | ८७.४ |

**कमी साक्षरता असणारे जिल्हे :**

| अ.क्र. | जिल्हे | साक्षरता दर |
|---|---|---|
| १ | नंदूरबार | ६४.४ |
| २ | जालना | ७१.५ |
| ३ | धुळे | ७२.८ |
| ४ | परभणी | ७३.३ |
| ५ | गडचिरोली | ७४.४ |

वरील साक्षरता दरावरून Top 5 Districts and Bottom 5 Districts ची स्थिती दिसून येते. साक्षरता दर हा तेथील राजकीय इच्छाशक्ती, लोकांचा जीवनमानाचा दर्जा, आर्थिक स्थर, उपलब्ध सुविधा, एकंदर मानव निर्देशांक सुचित होतो.

**सारांश :**

प्रौढ शिक्षण कार्यक्रम हा देशाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा कार्यक्रम आहे. प्रौढ शिक्षण चळवळीच्या माध्यमातून घरांघरांमधील निरक्षरता कमी केली जाते. या दृष्टिकोनातून राष्ट्रीय प्रौढ शिक्षण धोरण (१९७८ व १९८६) राबविला आहे. १९७८ च्या कार्यक्रमात खालील गोष्टींवर भर देण्यात आला.

१) निरक्षर प्रौढांच्या शिक्षणाच्या संदर्भातील गरजा आणि त्यांची सामाजिक परिस्थिती यादोन्हींचा समन्वय साधणारा अभ्यासक्रम तयार करणे.
२) प्रौढ शिक्षण व्यवस्थापनामध्ये लवचिकता आणणे, यामध्ये कार्यक्रमाचा कालावधी, लोकांच्या सवडीनुसार वेळ, सर्वांसाठी योग्य अशी जागा व शिकविण्याची व्यवस्था करणे.
३) प्रौढांचे अध्ययन, अध्यापन साहित्य, पध्दती व अभ्यासक्रम इत्यादीची योग्य मांडणी करणे.
४) या सर्व कार्यक्रमाचे व्यवस्थापन आणि प्रशासकीय अंमलबजावणी योग्यप्रकारे करणे.

१९८६ च्या धोरणात खालील उद्दिष्ट्ये ठरविण्यात आली.

१) राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रमांद्वारे समाजामध्ये आर्थिक, सामाजिक, राजकीय व लैंगिक स्वरूपातील
२) प्रौढ शिक्षण कार्यक्रमांद्वारे १५ ते ३५ वयोगटातील १ कोटी लोकांना साक्षर करणे, त्यामध्ये १९९० पर्यंत ४० लाख निरक्षर लोकांना व इ.स. १९९५ पर्यंत ६० लाख निरक्षर लोकांना साक्षर करून शिक्षणाच्या प्रवाहात आणणे.
३) निरक्षर प्रौढांच्या वैयक्तिक व सामाजिक गरजांचा अभ्यास करून त्या गरजांचे प्रतिबिंब प्रौढ शिक्षण अभ्यासक्रमांना उमटविणे.
४) राष्ट्रीय उद्दिष्टांच्या कार्यक्रमांसंदर्भात जाणीव प्रौढांमध्ये निर्माण करणे.
५) प्रौढांमध्ये अन्याय व अत्याचारांपासून मुक्त देण्याची इच्छा निर्माण करणे.

ही सर्व उद्दिष्ट्ये ठेवण्यामागे एकच उद्देश होता की भारतातील लोकांचा सर्व स्तरातून विकास व्हावा व निकोप समाजाची निर्मिती व्हावी.

**संदर्भ ग्रंथ :**

१) Dr.M. S. Kazi : Education Ladder.
२) Harold C. Shearman : Adult Education for Democracy
३) 2011 Census Report
४) डॉ. आनंद माधवराव वाघ : प्रौढ शिक्षणातील बदलते प्रवाह
५) इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ : राष्ट्रीय साक्षरता मिशन एज्युकेशन, पुणे.
६) जे. सी. अग्रवाल : भारत में प्रौढ शिक्षा.